मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर
M. S. KAKADE COLLEGE
Someshwarnagar - 412 306, Tal.: Baramati, Dist.: Pune

**Proceeding Book**

१. सभेचा प्रकार Kind of Meeting
२. सभेची तारीख Date of Meeting
५) सभेचे स्थळ Place of Meeting

# मु.सा.काकडे महाविद्यालय

# माजी विद्यार्थी संघटना

**सोमेश्वरनगर,ता.बारामती,जि.पुणे**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार

नोंदणी क्रमांक - महा./११९/२०१७ पुणे दिनांक : २०/१/२०१७

| | | |
|---|---|---|
| **श्री.शहाजी मुगुटराव काकडे देशमुख** | **श्री.जगन्नाथ एकनाथ पवार** | [redacted] |
| अध्यक्ष | खजिनदार | सचिव |

जावक नं. :

दिनांक : 23 / 05 /2022

प्रति,

मा. ..........................................................

..........................................................

..........................................................

स.न.वि.वि

आपल्या मु.सा.काकडे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक मंगळवार दि २४ मे २०२२ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता मा. शहाजीकाका काकडे-देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. सभेत पुढील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात येतील.

सभेपुढील विषय:-

१) मागील सभेचा इतिवृत्त वाचुन मंजुर करणे.

२)सुवर्णमोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी मेळाव्याची तयारी करणेबाबत चर्चा करणे.

३) महाविद्यालय वेबसाईडवर गुगल फार्मनुसार माजी विद्यार्थी नोंदणी संख्येबाबत चर्चा करणे.

४) माजी विद्यार्थी संघटनेच्या बॅक खाते बावत चर्चा व निर्णय घेणे.

५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐन वेळच्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे

Co-ordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC)
M. S. Kakade College, Someshwarnagar

समन्वयक
माजी विद्यार्थी संघटना
मु.सा.काकडे महाविद्यालय,सोमेश्वरनगर ता-बारामती जि-पुणे.

सचिव
माजी विद्यार्थी संघ
मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर, ता. बारामती.

# प्रोसिडिंग बुक

सूचना : सभेस हजर असलेल्या सभासदांची नावे गरजेप्रमाणे व जरुरीप्रमाणे स्वतः कागदावर लिहून ती यादी कामकाजास जोडावीत.



७. सभेस असलेल्या सभासदांची नावे Name of the members who were present at meeting.

श्री. शहाजी मुगुटराव काकडे-देशमुख
श्री. रमाकांत गायकवाड
श्री. सूर्यकांत रामचंद्र जेधे
श्री. रामदास निवृत्ती शिंदे
श्री. आनंदराव शिवराम जगताप
श्री. भिमराव केरबा बनसोडे
श्री. जगन्नाथ एकनाथ पवार
सौ. संगीता रमाकांत गायकवाड
श्री. संतोष विठ्ठल शेंडकर
श्री. विजयकुमार माणिकराव सोरटे
प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे

| विषय नंबर Subject No. | ठराव नंबर Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolution & Subjects placed before the Meeting for discussion | शेरे आणि तारखेस ठरावाची अंमलबजावणी Remarks & or action taken on the resolution & Date |
|---|---|---|---|
| | | मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेची बैठक मंगळवार दि. २४ मे २०२२ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता महाविद्यालयाच्या प्राचार्य कार्यालयात माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मा. शहाजीकाका काकडे-देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. सभेत पुढील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. | |
| १. | | मागील सभेचा इतिवृत्त वाचून मंजूर करणे. | |
| | | सभेच्या सुरवातीस माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक डॉ. जगन्नाथ साळवे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले यावर कोणत्याही सदस्याचा आक्षेप नसल्यामुळे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आला. | |
| २. | | सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी मेळाव्याची तयारी करणे बाबत चर्चा करणे. | |
| | | माजी विद्यार्थी मेळाव्याची तारीख दि. १९ जून २०२२ निश्चित केलेली असून त्याची पूर्व तयारी करणे गरजेचे आहे. त्यामध्ये माजी विद्यार्थ्यांना निमंत्रीत करणे हे सर्वात महत्वाचे काम असल्याचे माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री. शहाजीकाका काकडे देशमुख यांनी सांगितले यावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी माजी विद्यार्थी मेळाव्याच्या पूर्वतयारीचा आराखडा वाचून दाखविला त्यामध्ये नोंदणी, गुलाबपुष्प देणे | |

मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर
**M. S. KAKADE COLLEGE**
Someshwarnagar - 412 306, Tal.: Baramati, Dist.: Pune

# Proceeding Book

१. सभेचा प्रकार / Kind of Meeting
२. सभेची तारीख / Date of Meeting
३. सभेचा क्रमांक / S.No. of Meeting
४. सभेची वेळ / Time of Meeting
५) सभेचे स्थळ / Place of Meeting

६. सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची नावे (हुद्यासह) । Name & designation of Officials and respectable persons.

सभेचे अध्यक्ष - Chairman of the Meeting

| विषय नंबर Subject No. | ठराव नंबर Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolution & Subjects placed before the Meeting for discussion |
|---|---|---|
| | | चहापान व्यवस्था, निमंत्रण पत्रीका, स्टेज व्यवस्था स्वागत कमीटी, स्वच्छता कमिटी, बैठक व्यवस्था सुकाणू कमीटी, पार्कींग कमीटी या सर्व प्रकारच्या कमीटी करण्यात येणार असल्याचे सांगितले.<br>श्री. जे. ई. पवार आणि श्री. आनंदराव शिवराम जगताप यांनी असा मुद्दा मांडला की, आजी विद्यार्थ्यांचा सहभाग असावा व आजी विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात यावे. तसेच १९७२ पासूनच्या फोटोंचे दालन करण्यात यावे. कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत सखोल चर्चा करण्यात आली व निर्णय घेण्यात आला. |
| ३. | | महाविद्यालय वेबसाईटवर गुगल फॉर्मनुसार माजी विद्यार्थी नोंदणी संख्येबाबत चर्चा करणे<br>११ मे २०२२ च्या सभेमध्ये ६३० विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्याचे श्री रजनीकांत गायकवाड यांनी सांगितले होते. सध्या १५५४ विद्यार्थ्यांनी नोंद केलेली आहे. यावर सर्वांनीच समाधान व्यक्त केले. |
| ४. | | माजी विद्यार्थी संघटनेच्या बँक खाते बाबत चर्चा व निर्णय.<br>मागील सभेमध्ये माजी विद्यार्थी संघटनेचे युको खाते बंद असल्याचे माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक डॉ. जगन्नाथ साळवे यांनी |

# प्रोसिडिंग बुक

सूचना : सभेस हजर असलेल्या सभासदांची नावे गरजेप्रमाणे व जरुरीप्रमाणे स्वत: कागदावर लिहून ती यादी कामकाजास जोडावीत.



७. सभेस असलेल्या सभासदांची नावे । Name of the members who were present at meeting.

| विषय नंबर Subject No. | ठराव नंबर Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolution & Subjects placed before the Meeting for discussion | शेरे आणि तारखेस ठरावाची अंमलबजावणी Remarks & or action taken on the resolution & Date |
|---|---|---|---|
| | | सांगितले होते. परंतु बँकेमध्ये पुन्हा चौकशी केली असता दि. २८-०८-२०१८ रोजी उघडलेले खाते पुन्हा चालू होऊ शकेल यावर ते चालू करण्यासाठी सर्व कागदपत्रे बँकेला सादर केली व बडोदा बँकेतील खाते क्रमांक ०४५४०९१०००९०९९९ हे चालू झाल्याचे सांगितले यावर सर्वांनीच समाधान व्यक्त केले. | |
| ५ | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐन वेळच्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे. | |
| | | आयत्या वेळच्या विषयामध्ये श्री. जे. ई. पवार यांनी असे सुचविले कि माजी विद्यार्थी कार्यक्रमाच्या ठिकाणी सजेशन बॉक्स ठेवावा. तसेच माजी विद्यार्थी निधीसाठी माजी विद्यार्थी संघटनेच्या बँक खातेचा पे ॲप ठिक ठिकाणी लावावे. यावर सखोल चर्चा झाली यानंतर सभेच्या अध्यक्षांचे व उपस्थित सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याची घोषणा माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक प्रा. डॉ. जगन्नाथ साळवे यांनी केली. | |

Co-ordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC)
M. S. Kakade College, Someshwarnagar

M.S.K. COLLEGE

माजी विद्यार्थी संघ
मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर, ता. बारामती.

PRINCIPAL
Mugutrao Sahebrao Kakade College,
Someshwarnagar,Dist.Pune-412306

अध्यक्ष
माजी विद्यार्थी संघ
मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर, ता. बारामती.

# मु.सा.काकडे महाविद्यालय
# माजी विद्यार्थी संघटना

सोमेश्वरनगर,ता.बारामती,जि.पुणे
संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार
नोंदणी क्रमांक - महा./११९/२०१७ पुणे दिनांक : २०/१/२०१७

| श्री.शहाजी मुगुटराव काकडे देशमुख | श्री.जगन्नाथ एकनाथ पवार | डॉ.देविदास भीमराव वायदंडे |
|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | सचिव |

जावक नं. : 

दिनांक : 24/03/2023

प्रति,

मा. ............................................................

............................................................

............................................................

स.न.वि.वि

आपल्या मु.सा.काकडे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक रविवार दि.२६ मार्च २०२३ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता मा. शहाजीकाका काकडे-देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. सभेत पुढील विषयांवर चर्चा होऊन निर्ण य घेण्यात येतील.

**सभेपुढील विषय:-**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुर कारणे.
२) नॅक समिती भेटीदरम्यान माजी विद्यार्थी संवाद सत्राचे नियोजन करणे.
३) नॅक भेटीसाठी माजी विद्यार्थी संघाची जबादारी व करावयाची कामे याचा आढावा घेणे.
४) नॅक कामकाजाचा आढावा घेणे.
५) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षातील महाविद्यालयीन शैक्षणिक कार्यकमाचा आढावा घेणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐन वेळच्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.

सचिव
माजी विद्यार्थी संघ
मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर, ता. बारामती.

७. सभेस असलेल्या सभासदांची नावे Name of the members who were present at meeting.

श्री. शहाजी मुकुटराव काकडे-देशमुख - [signature]
श्री. रामदास निवृत्ती शिंदे - [signature]
श्री. आनंदराव शिवराम जगताप - [signature]
श्री. जगन्नाथ एकनाथ पवार -
श्री. रमाकांत महादेव गायकवाड - [signature]
श्री. सुर्यकांत रामचंद्र जेधे - [signature]
श्री. भिमराव केरबा बनसोडे - [signature]
सौ. संगीता रमाकांत गायकवाड [signature]
श्री. विजयकुमार माणिकराव सोरटे [signature]
श्री. संतोष विठ्ठल शेडकर - [signature]
प्राचार्य. डॉ. देविदास वायदंडे - [signature]

| विषय नंबर Subject No. | ठराव नंबर Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolution & Subjects placed before the Meeting for discussion | शेरे आणि तारखेस ठरावाची अंमलबजावणी Remarks & or action taken on the resolution & Date |
|---|---|---|---|
| | | मुकुटराव साहेबराव काकडे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाची बैठक रविवार दि. २६ मार्च 2023 रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महाविद्यालयाच्या प्राचार्य कार्यालयात माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. शहाजी काका - काकडे देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. बैठकीत खालील विषयावर चर्चा करण्यात आली व निर्णय घेण्यात आला. | |
| १) | | मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे. | |
| | | सभेच्या सुरुवातीला माजी विद्यार्थी संघाचे समन्वयक प्रो. डॉ. जगन्नाथ साळवे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले यावर कोणत्याही सदस्यांचा आक्षेप नसल्याने मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले. | |
| २) | | नॅक समिती भेटीदरम्यान माजी विद्यार्थी संवाद सत्राचे नियोजन करणे. | |
| | | नॅक समितीची भेट दि. १७ व १८ एप्रील 2023 रोजी होणार असल्याचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी सांगितले. या नॅक समिती भेटीदरम्यान माजी विद्यार्थी संवाद सत्र होणार आहे. त्यामुळे याची तयारी करून घेणे गरजेचे आहे. | |
| | | यावर माजी विद्यार्थी संघाचे सदस्य श्री. जेधे सुर्यकांत यांनी असे विचारले की नॅक | |

मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर
**M. S. KAKADE COLLEGE**
Someshwarnagar - 412 306, Tal.: Baramati, Dist.: Pune

**Proceeding Book**

१. समेचा प्रकार Kind of Meeting ..........
२. समेची तारीख Date of Meeting ..........
५) समेचे स्थळ Place of Meeting ..........
3. समेचा क्रमांक S.No. of Meeting ..........
४. समेची वेळ Time of Meeting ..........

६. समेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची नावे (हुद्यासह) : Name & designation of Officials and respectable persons. ..........

समेचे अध्यक्ष - Chairman of the Meeting ..........

| विषय नंबर Subject No. | ठराव नंबर Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolution & Subjects placed before the Meeting for discussion |
|---|---|---|
| | | समिती आम्हाला कोणते प्रश्न विचारले जातील याबद्दल आम्हाला थोडीशी माहीती द्यावी. यावर नॅक समन्वयक प्रा. डॉ. संजू जाधव यांनी नॅक समिती कोणत्या प्रश्नावर चर्चा करतील या संभाव्य प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. व अशा प्रकारचे प्रश्नांची प्रत सदस्यांना द्यावी अशी मागणी करण्यात आली. यावर चर्चा करण्यात आली व नॅकसाठी तयारी म्हणून प्रश्न टाईप करून सदस्यांना दिले जातील असा निर्णय घेण्यात आला. |
| | | तसेच अनखी काय विचारले जाईल असे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष शहाजी काका काकडे-देशमुख यांनी विचारले. यावर नॅक समन्वयक संजू जाधव यांनी असे सांगितले की, माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला केलेल्या सूचना व महाविद्यालयाने त्याची अंमलबजावणी या विषयावर विचारणा होऊ शकेल. |
| ३) | | नॅक भेटीसाठी माजी विद्यार्थी संघाची जबाबदारी व करावयाची कामे यांचा आढावा. |
| | | नॅक भेटीसाठी माजी विद्यार्थी संघातील सर्व सदस्यांनी नॅक भेटीमध्ये विचारलेल्या प्रश्नांची तयारी करावी तसेच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना नॅक भेटीसाठी येण्याची विनंती करावी. असे मत माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष शहाजी काकडे यांनी मांडले. यावर मा. प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी असे सांगितले की. नॅक |

७. सभेस असलेल्या सभासदांची नावे Name of the members who were present at meeting.

| विषय नंबर Subject No. | ठराव नंबर Resolution No. | सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय आणि ठराव Resolution & Subjects placed before the Meeting for discussion | शेरे आणि तारखेस ठरावाची अंमलबजावणी Remarks & or action taken on the resolution & Date |
|---|---|---|---|
| | | समिती कोणते संभाव्य प्रश्न विचरतील या प्रश्नांची यादी आम्ही तुम्हाला देऊ. आपणास नॅक बरोबरच्या बैठकीसाठी पन्नास ते साठ माजी विद्यार्थ्यांची गरज आहे. यावर चर्चा करण्यात आली. व माजी विद्यार्थ्यांना नॅक भेटीसाठी बोलावण्याचा निर्णय घेण्यात आला. | |
| ४) | | नॅक कामकाजाचा आढावा - | |
| | | नॅक भेटीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कामांची तयारी चालू आहे. प्रशासकीय कामे पूर्ण झाली आहे. सुशोभीकरणाची कामे चालू आहे. या सर्व गोष्टींचा आढावा प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी दिला. | |
| ५) | | शैक्षणिक वर्ष 2022-23 या शैक्षणिक वर्षातील कार्यक्रमाचा आढावा घेणे. | |
| | | शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये कोणकोणते कार्यक्रम घेतले याचा संक्षिप्त आढावा प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी दिला. यावर सर्वांनी समाधान व्यक्त केले. | |
| ६) | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐन वेळच्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे. | |
| | | ऐन वेळच्या विषयामध्ये कोणताही विषय चर्चेसाठी नसल्याने महाविद्यालयाचे प्राचार्य व माजी विद्यार्थी संघाचे सचिव डॉ. देविदास वायदंडे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर सदस्य म्हणून प्राचार्य मधून बिनविरोध निवड झाल्याबद्दल अध्यक्षांच्या शुभहस्ते अभिनंदन करण्यात आले. व सभा संपल्याची घोषणा करण्यात आली. | |

Co-ordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC)
M. S. Kakade College, Someshwarnagar

सचिव
माजी विद्यार्थी संघ
मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर, ता. बारामती.

अध्यक्ष
माजी विद्यार्थी संघ
मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर, ता. बारामती.